**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ०६ दिनांक १३/०२/२०२४**

# स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडून बोईसर पोलीस ठाणे येथे दाखल घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपी अटक.

दिनांक ०७/०२/२०२४ रोजी १२.०० ते सायंकाळी ०६.४५ वाजताचे दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीताने फिर्यादी यांचे रुम नं. ४०४, बि.नं. ई-३, शादावल इंप्रेशन, सरावली, बोईसर, ता.जि. पालघर या रुमचा सेफ्टी दरवाजाचे लॅचलॉक कशाचे तरी सहाय्याने तोडून त्याआतील लाकडी दरवाजाची कडी कापुन बेडरुममध्ये ठेवलेल्या लाकडी कपाटातील दागीने व रोख रक्कम असा एकुण २,१२,०००/- रु. किंमतीचा माल फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने, स्वतःचे आर्थीक फायदयाकरीता घरफोडी चोरी करुन चोरुन नेले आहेत म्हणुन बोईसर पोलीस ठाणे येथे I ५४/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरील गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना तपास पथक तयार करुन योग्य त्या सुचना देऊन मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांनी पोउपनि/गणपत सुळे व त्यांची टिम यांचे पथक तयार करुन रवाना केले. सदर पथकाने तांत्रीक व गुप्त बातमीदाराच्या सहायाने आरोपीत यांना बोईसर येथून ताब्यात घेतले असता आरोपीत नामे १) मोहमद शकीब मोहमद शौकत अन्सारी वय २३ वर्षे, रा. छेब्री, पो. रोरकोट ता. जि. बिजनोर, राज्य उत्तर प्रदेश, २) मोहमद उमर महेफुज अहमद, वय ३० वर्षे, रा. जामीया रेसीडेन्सी बिजली बंब बायपास बी- ४९ पीरवाला रोड, मेरठ, राज्य उत्तर प्रदेश, ३) फर्मान अहमद मुज्जमील अहमद, वय ४१ वर्षे, रा. महान नं.२०० जामीया रेसीडेन्सी बिजली बंब बायपास बी- ४९ पीरवाला रोड, मेरठ, राज्य उत्तर प्रदेश, ४) मोहमद दानिश मोहमद वरीश मलीक, वय २४ वर्षे, रा. लिसाळी, फत्तेपुर मेरठ, राज्य उत्तर प्रदेश यांचेकडे कसुन चौकशी केली असता त्यांनी वरील गुन्हा केल्याचे कबुल केले. तसेच सदर आरोपीत यांनी सदरचा गुन्हा करण्यासाठी माहे सप्टेंबर २०२३ मध्ये मालवीय नगर साउथ दिल्ली येथून चोरी केलेल्या ब्रिजा मारुती कंपनीची कारचा वापर केल्याचे निष्पन्न झाले आहे. ब्रिजा मारुती कार चोरी प्रकरणी मालविय नगर येथे गुरनं ०२९२९५/२०२३ दाखल आहे. आरोपीत यांनी सदर वाहनाद्वारे उत्तर प्रदेश ते मुंबई असा प्रवास करुन पालघर जिल्ह्यातील बोईसर पोलीस ठाणे व पालघर पोलीस ठाणे येथे दिवसा घरफोड्या केलेल्या आहेत.

सदर आरोपीतांकडून बोईसर पोलीस ठाणे गुरनं । ५४/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० मधील गेले मालातील सोन्याचे दागीने व गुन्ह्यात वापरलेले वाहन तसेच दिवसा घरफोडी करण्यासाठी वापरलेले हत्यार व महाराष्ट्रातील बनावट नंबर प्लेट असा एकूण ७,२५,०००/- रुपयेचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आत्तापर्यंत वरील आरोपीकडून खालील गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

१. बोईसर पोलीस ठाणे गुरनं । ५४/२०२४ भादविसं कलम ४५४, ३८०
२. पालघर पोलीस ठाणे गुरनं । २४/२०२४ भादविसं कलम ४५४, ३८०
३. मालविय नगर साउथ दिल्ली गुरनं । ०२९२९५/२०२३ भादविसं कलम ३७९

सदर गुन्ह्याचा अधिक तपास हा पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल मनिकेरी, नेम. बोईसर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, पोउपनि/गणपत सुळे, पोहवा/१११६ संतोष निकोळे, पोहवा/२०१ दिलीप जनाठे, पोहवा/४४४ विजय ठाकुर, पोना/कल्याण केंगार, पोशि/वैभव जामदार, पोशि/प्रशांत निकम सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, तसेच सायबर पोलीस ठाणे, पालघर येथील स्टाफ यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.